स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत मराठी विषयात 'विद्यावाचस्पती' (पीएच.डी.)

पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

वीरशैव मराठी अभंग वाङ्मयाचा कन्नड वचन साहित्याशी असलेला अनुबंध : एक चिकित्सक अभ्यास

मार्गदर्शक

डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे
(मराठी विभाग)
वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर जि.नांदेड

संशोधक

श्री शिवशरण गुरुपदआप्पा रटकलकर
(सहशिक्षक)
डॉ. यू. एस. वानखेडे विद्यालय
कंजारा ता. औंढा (नाग.) जि. हिंगोली
Gmail : shivsharanguruji @gmail.com दूरभाष : ९४२३९५१००६

संशोधन केंद्र

मराठी भाषा-साहित्य संशोधन केंद्र,
देगलूर महाविद्यालय, देगलूर

सन २०२३

वीरशैव मराठी अभंग वाड्मयाचा कन्नड वचन साहित्याशी असलेला अनुबंध : एक चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना :

उदात्त जीवनमूल्ये प्रदान करणाऱ्या भारतीय संस्कृतीचा आम्हा सर्वांनाच नितांत आदर वाटतो. भारतभूमीत अनेक संत महात्मे, थोर महापुरुष होऊन गेले. त्यांनी प्रस्थापित केलेली जीवनमूल्ये कल्याणाचा मार्ग दाखवतात. मानवी जीवन सुखकर, शांततापूर्ण, समृध्द करण्यामध्ये भारतीय संत साहित्याचे योगदान मौलिक स्वरूपाचे आहे. कुळ, जात, वर्ण, लिंग, पंथ, प्रांत आणि देशाच्या सीमा ओलांडून उदात्त परंपरेला समृध्द करण्याचे सामर्थ्य भारतीय संत साहित्यात आहे. काळाच्या उदरातून उद्‌भवणाऱ्या प्रत्येक नवीन प्रश्नाचे उत्तर देण्याचे मर्म भारतीय संत साहित्यात आहे.

दक्षिण भारतामध्ये संत साहित्याचा पहिला आविष्कार कर्नाटकात झालेला आहे. बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी कल्याण क्रांती घडवून आणली. या कल्याण क्रांतीतूनच वचन साहित्य आकाराला आले. या वचन साहित्याचा प्रभाव दक्षिण भारतातील विविध सांप्रदायाच्या साहित्यावर पाहायला मिळतो. महाराष्ट्र प्रांत कर्नाटकाच्या लगत असल्यामुळे इतर प्रांताच्या तुलनेत महाराष्ट्रातील संत साहित्यावर महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्याचा प्रभाव अधिक जाणवतो.

महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत संत परंपरा महात्मा बसवेश्वरांशी आपले नाते सांगते. महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत संत कन्नड भाषा जाणणारे असल्यामुळे त्यांनी मुळातून कन्नड वचन साहित्याचा अभ्यास केला होता. कन्नड वचन साहित्याचा त्यांचा लक्षणीय व्यासंग होता. संस्कृत शैव साहित्याएवढेच कन्नड वचन साहित्य त्यांनी महत्त्वाचे मानले होते. शिवाचार महाराष्ट्रात रूजवण्याच्या भूमिकेत मराठी वीरशैव लिंगायत संतांनी संस्कृत

शैवग्रंथांवर मराठीतून मोठ्या प्रमाणात भाष्य लेखन केले. त्यांच्या या भाष्य ग्रंथावर काही ठिकाणी अप्रत्यक्षपणे महात्मा बसवेश्वरांच्या विचाराचा प्रभाव पाहायला मिळतो. विशेषतः वीरशैव लिंगायतांचे अभंग वाङ्मय कन्नड वचन साहित्याच्या अधिक जवळ जाते. मराठी वीरशैव लिंगायत संतांचे अनेक अभंग कन्नड वाचनाची प्रतिकृती वाटतात. तर काही अभंगांतून वचन साहित्यातील मूल्यविचार प्रतिध्वनीत झाल्याचे पाहायला मिळते. या दृष्टीने मराठी वीरशैव लिंगायत संतांच्या अभंगवाणीचा कन्नड वचन साहित्याशी असणारा अनुबंध अभ्यासणे महत्त्वाचे ठरते.

विषय निवडीचे औचित्य / हेतू :-

वीरशैव लिंगायत सांस्कृतिक - सांप्रदायिक परंपरेतच माझे कुटुंब पिढयानपिढ्या जगत आल्यामुळे अर्थातच बालपणापासून माझ्यावर धार्मिक विचारांचा पगडा राहिला. माझे आई वडील वीरशैव गुरुपरंपरा व कन्नड शरण शरणी परंपरा असा समन्वय साधणारे. त्यातच योगायोग म्हणून मला सांप्रदायिक भजन, कीर्तन, प्रवचनाची गोडी लागली. शिवकीर्तन प्रवचनामुळे विज्ञान विषयाचा पदवीधर असूनही पदव्युत्तर मराठी विषयाची आवड वाढत गेली. काही अनाकलनीय संबोधांमुळे संत साहित्याचा अभ्यास करावा ही अंत:प्रेरणा जागृत झाली. त्यामुळे मराठी वीरशैव लिंगायत संत साहित्य आणि कन्नड वचनसाहित्य असा समन्वय साधावा असे मुळापासून वाटत गेले. वीरशैव मराठी अभंगवाणी आणि कन्नड वचन साहित्य या दोहोंचा अनुबंध अभ्यासण्याची अत्यंतिक ओढ निर्माण झाली. मराठी अनुवादीत कन्नड वचनांचा आणि वीरशैव संतांच्या अभंगांचा समन्वय शोधण्याच्या दृष्टीने फारशे संशोधन यापूर्वी झाल्याचे मला आढळले नाही. ही उणीव भरून काढण्याच्या भूमिकेतून **'वीरशैव मराठी अभंग वाङ्मयाचा कन्नड वचन साहित्याशी असलेला अनुबंध : एक चिकित्सक अभ्यास'** हा विषय मी प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :-

१) महात्मा बसवेश्वर समकालीन कन्नड वचनकार शरण शरणींच्या वचन साहित्याचा अभ्यास करणे.

२) महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत संत परंपरेचा अभ्यास करणे.

३) मराठी वीरशैव लिंगायत संतांच्या अभंग वाङ्मयाचा कन्नड वचन साहित्याशी असलेला अनुबंध अभ्यासणे.

४) मराठी वीरशैव लिंगायत संतांच्या अभंगवाणीवर असलेला कन्नड वचन साहित्याचा प्रभाव अभ्यासणे.

५) महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन प्रांतातील सांप्रदायिक अनुबंध शोधणे.

गृहितके / परिकल्पना :-

प्रस्तुत संशोधन करत असताना खालीलप्रमाणे गृहितके निश्चित केलेली आहेत.

१) मराठी वीरशैव लिंगायत अभंग वाङ्मयाचा कन्नड वचन साहित्याशी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अनुबंध आहे.

२) मराठी वीरशैव संत बाराव्या शतकातील वचन साहित्याशी नाळ जोडून होते.

३) भाष्यग्रंथांच्या तुलनेत वीरशैव संतांच्या अभंगवाणीत वचन साहित्यातील जीवनमूल्ये अधिक आढळतात.

४) मराठी वीरशैव लिंगायत संत साहित्यास कन्नड वचन साहित्याचे अधिष्ठान आहे.

५) महाराष्ट्र आणि कर्नाटक मध्ये एक वैचारिक अनुबंध आहे.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोध0न कार्यासाठी मी विश्लेषणात्मक पध्दती, वर्णनात्मक पध्दती, नमुना निवड आणि तौलनिक पध्दतींचा अवलंब करणार आहे. कन्नड वचनकार निवडक शरण शरणी आणि वीरशैव संत परंपरेतील निवडक संतकवी यांच्या चरित्रांचा व वाङ्मयांचा ऐतिहासिक, साहित्यिक दृष्टिकोनातून अभ्यास करणार आहे. वचन साहित्याचा मराठी अभंगवाणीशी असलेला अनुबंध शोधण्याचा प्रयत्न करणार आहे. या संशोधनात कन्नड वचनकारांचे मराठी अनुवादीत वचन साहित्य, त्यांचे चरित्र वाङ्मय तसेच वीरशैव संतकवींचे मराठी अभंग वाङ्मय यांचा मुळातून अभ्यास करणार आहे. त्याच बरोबर या विषयांशी संबंधित विविध साहित्य, संदर्भ ग्रंथ, प्रकाशीत- अप्रकाशीत शोधप्रबंध, नियतकालिके, प्रसारीत लेख यांचाही आधार घेतला जाणार आहे. कन्नड वचन साहित्य आणि मराठी संत साहित्याच्या जाणकार अभ्यासकाशी संवाद साधून प्रस्तुत संशोधनाशी निगडित आधारभूत तथ्याचे संकलन करणार आहे. प्रस्तुत संशोधनाशी निगडीत आधारभूत माहिती संकलनाच्या हेतूने कर्नाटक आणि महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत संत पिठांना भेटी दिल्या जाणार आहेत.

संशोधन विषयाचे महत्व :-

'वीरशैव मराठी अभंग वाङ्मयाचा कन्नड वचन साहित्याशी असलेला अनुबंध : एक चिकित्सक अभ्यास' या विषयावरील संशोधनातून मराठी संत साहित्य अभ्यासाच्या कक्षा निश्चितच आहेत. प्रस्तुत संशोधनातून कन्नड वचन साहित्य आणि अभंग वाङ्मय यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट होणार आहे. महाराष्ट्राचा कर्नाटकाशी असलेला वैचारिक अनुबंध जगासमोर येणार आहे. मराठी वीरशैव संत साहित्याची अनेक अनाकलनीय गोष्टींचा उलगडा प्रस्तुत शोध प्रबंधात होणार आहे. मराठी वीरशैव लिंगायत संतांच्या अभंगातील बंडखोरी व त्याचे मूळ अभ्यासण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे ठरणार आहे. वीरशैव

संत साहित्यावर आणि वचन साहित्यावर संशोधन करणा-या पुढील संशोधकांस हे संशोधन मार्गदर्शक ठरणार आहे. भारतीय संत साहित्याचा तौलनिक अभ्यास करणाऱ्या पुढील संशोधकांना हे संशोधन आधारभूत ठरणार आहे. यातून सांस्कृतिक व भाषिक साहचर्य सौहार्द वाढीस लागणार आहे. भाषा आणि साहित्याप्रमाणेच दर्शनशास्त्र, तत्त्वज्ञान, नीतीशास्त्र यांच्यासह मानवी ज्ञान शाखेतील विविध शास्त्रांच्या पुढील संशोधनाच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनकार्य खूप उपयुक्त ठरणार आहे.

संदर्भ साहित्याचा आढावा :-

मराठी तथा कन्नड साहित्यविश्वात अनेक मान्यवर अभ्यासकांनी संत साहित्यावर मौलिक स्वरूपाचे संशोधन कार्य केलेले आहे. त्याचा धावता आढावा मी येथे घेणार आहे. कन्नड वचनांचा मराठी अनुवाद करून वचन तत्वज्ञान आमच्यापर्यंत पोहचविण्याचे महत्कार्य वचन पितामह डॉ. फ. गु. हळकट्टी यांच्या साहित्यावर प्रा. आर. एम. करडीगुद्दी यांनी मराठी अनुवाद केलेला 'वचन सिध्दांत सार' हा विशाल वचन संग्रह खूपच उपयुक्त आहे. कन्नड वचनांचा वीरशैव संतांच्या अभंगांशी असलेला अनुबंध अभ्यासण्यासाठी डॉ. शे. दे. पसारकर यांनी 'वीरशैव अभंगगाथा : खंड १' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ उपलब्ध करून दिला आहे. तसेच डॉ- शिवलिंग शिवाचार्य, महाराज वीरमठ राजुर यांचा 'श्री मन्मथस्वामी सांप्रदायिक सप्तरत्न गाथा' संस्कृती प्रकाशन त्याचप्रमाणे "तपोरत्न ग्रंथमाला' संस्थान मठ - माजलगाव यांची शिवसांप्रदायिक नवरत्न संत भजनमालिका, श्री चन्नाकृत अभंगगाथा उपलब्ध आहेत. पं. शिवाप्पा खके यांचा श्री महादेवप्रभू गाथा, सिध्देश्वर प्रकाशन वसमत, आष्टीची विस्तृत श्री लक्ष्मण गाथा- डॉ शे. दे. पसारकर, तसेच संस्कृती प्रकाशन राजूरचे संतसाहित्य, शैवभारती प्रतिष्ठाण जंगमवाडी मठ, वाराणसी यांनी प्रकाशीत केलेले डॉ. वैजनाथ फास्के, डॉ. भी. शि. स्वामी, डॉ. चंद्रशेखर शि. कपाळे, डॉ. विजय

अपसिंगकर, डॉ. श्यामाताई घोणसे, डॉ. शोभा धर्मराज कराळे, डॉ. चंद्रकांत देऊळगावकर, डॉ. सूर्यकांत घुगरे यांसारख्या विद्वानांचे शोधप्रबंध तथा महाराष्ट्र बसव परिषद्, हिरेमठ संस्थान भालकी यांनी प्रकाशीत केलेले पुष्कळसे कन्नड भावानुवादीत मराठी ग्रंथ, वचन अनुवादीत साहित्य इत्यादी मोलाची मदत करतील. बसवयुगीन शरणांची वचने, शरण जीवन दर्शन, बसवोत्तर शरणांची वचने, बसवमार्ग, बसव तत्वचिंतन, अनेक शरण शरणींची जीवनचरित्रे प्रस्तुत संशोधनासाठी महत्त्वपूर्ण संदर्भ ठरतील. महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांत यापूर्वी सादर झालेले शोधप्रबंध प्रस्तुत संशोधनासाठी संदर्भ साहित्य म्हणून उपयुक्त ठरतील.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनात महात्मा बसवेश्वर समकालीन निवडक दहा शरण शरणींच्या मराठी अनुवादीत वचन साहित्याचा अभ्यास केला जाणार आहे. त्याच बरोबर वीरशैव संतांच्या अभंगवाणीचा अभ्यास करण्यासाठी श्रीसंत मन्मथस्वामी पासून सुरु झालेली शिव सांप्रदायिक निवडक संतांची अभंगरचना अभ्यासली जाणार आहे. वीरशैव संतांच्या अभंग वाङ्मयाचा कन्नड वचन साहित्याशी असलेला अनुबंध अभ्यासण्यासाठी मराठी अभंगवाणी, स्फुट काव्य यांचा सविस्तर अभ्यास केला जाणार आहे. या संशोधनाच्या केंद्रस्थानी वीरशैव संतांचे अभंग व अनुवादीत कन्नड वचन साहित्य वाङ्मय असणार आहे.

शोध प्रबंधाच्या प्रकरणांची रुपरेषा :-

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या विषयाची व्याप्ती व मर्यादा लक्षात घेऊन 'वीरशैव मराठी अभंग वाङ्मयाचा कन्नड वचन साहित्याशी असलेला अनुबंध : एक चिकित्सक अभ्यास' या विषयाचा सूक्ष्मपणे अभ्यास करण्यासाठी शोधप्रबंधाची रचना एकूण ०८ प्रकरणांमध्ये केली जाणार आहे.

प्रकरण पहिले

प्रस्तावना / संशोधन परिचय

या प्रकरणात संशोधन विषयाची पार्श्वभूमी, प्राथमिक ओळख, शोधण्याची उद्दिष्टे, गृहीतके, संशोधन पध्दती, संशोधन विषयाचे महत्व, संशोधनपूर्व संदर्भ साहित्य, संशोधनाचे महत्त्व, आंतरविद्याशाखीय सहसंबंध, संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा इत्यादी घटकांची मांडणी केली जाणार आहे.

प्रकरण दुसरे

वीरशैव-लिंगायत संस्कृतीचा उद्गम आणि विकास

प्रस्तुत प्रकरणात भारतीय तत्वज्ञानात शैव दर्शन तत्वप्रणाली कशाप्रकारे उद्गम व विकास पावली, कसे स्वतंत्र अस्तित्व बाळगून आहे याचे विवेचन केले जाणार आहे. प्राचीन परंपरा लाभलेल्या शैवदर्शनामध्ये आचार्य, ऋषी, नकुलीश, पाशुपत, काश्मिरी शैव, शक्तिविशिष्टाव्दैती वीरशैव, शैवाव्दैती, नाथ परंपरा, लिंगायत शरणशरणी परंपरा ते अलीकडच्या काळातील वीरशैव मराठी संत वाङ्मय परंपरेचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण तिसरे

वचन साहित्य : संकल्पना व स्वरूप

या प्रकरणामध्ये साधारणतः बाराव्या शतकापूर्वीची कन्नड साहित्य परंपरा, कन्नड वचन साहित्याची पार्श्वभूमी, वचन संकल्पना, वचन व्युत्पत्ती, वचन साहित्याच्या व्याख्या, वचन साहित्याच्या प्रेरणा, वचन साहित्याचे स्वरूप विशेष, वचन साहित्याचे निराळेपण या घटकांचा विचार केला जाणार आहे.

प्रकरण चौथे

महात्मा बसवेश्वर व समकालीन शरणांचे वचन साहित्य

प्रस्तुत प्रकरणात बाराव्या शतकातील महात्मा बसवेश्वर समकालीन व बसवोत्तरकालीन अशा एकूण दहा निवडक शरण शरणींच्या वचनसाहित्याचा विस्ताराने अभ्यास जाणार आहे. अनुवादीत कन्नड वचनांतील वीरशैव-लिंगायत अष्टावरण, पंचाचार, षट्स्थल इत्यादी सिद्धांतांची चिकित्सा केली जाणार आहे. वचन साहित्यातील मूल्यविचार अभ्यासला जाणार आहे.

प्रकरण पाचवे

अभंगछंद : संकल्पना व स्वरूप

या प्रकरणात मराठी साहित्यातील अत्यंत महत्त्वाचा काव्यप्रकार अभंगछंद विस्तृतपणे अभ्यासला जाणार आहे. संत वाङ्मयातील अभंग छंद, अभंग वाङ्मयाचे स्वरूप आणि प्रकार, अभंग लेखनामागे मराठी संतांची भूमिका, अभंग वाङ्मयाचे स्वरूप विशेष, निवडक वारकरी संतांच्या अभंगाची परंपरा इत्यादी घटकांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सहावे

मराठी वीरशैव संतांची अभंगवाणी

निवडक वीरशैव संतांची वचन सिद्धांताशी अनुबंध साधणारी अभंगरचना या प्रकरणात अभ्यासली जाणार आहे. संत मन्मथस्वामी, संत लिंगेश्वर, संत बसवलिंग स्वामी, संत महादेव प्रभू, संत शिवदास , शिवसंत लक्ष्मण महाराज आष्टीकर इत्यादी संतांच्या अभंगांचा आशयाच्या अंगाने विस्तृतपणे अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सातवे

कन्नड वचन साहित्य आणि मराठी वीरशैव संतांचे अभंग : वैचारिक अनुबंध

या प्रकरणात अनुवादित कन्नड वचन साहित्यातील पंचाचार, षटस्थल, अष्टावरण सिद्धांतांचा मराठी वीरशैव संतांच्या अभंगावर असलेल्या प्रभावाचा अभ्यास केला जाणार आहे. वचन साहित्यातील समता, बंधुता, सत्य, अहिंसा, दया, शांती, प्रयत्नवाद, शुद्ध कायक - श्रमनिष्ठा, प्रपंचनिष्ठा, उद्योगशीलता, दासोह या मूल्यांचा मराठी वीरशैव लिंगायत संतांच्या अभंगावरील प्रभाव अभ्यासला जाणार आहे.

प्रकरण आठवे

निष्कर्षात्मक समारोप

प्रस्तुत प्रकरणात मागील सर्व प्रकरणांतून हाती आलेल्या निष्कर्षांचा एकत्रीत विचार करून वीरशैव मराठी अभंग वाङ्मयाचा कन्नड वचन साहित्याशी असलेला अनुबंध सिद्ध केला जाणार आहे.

[**टीप :** वरीलप्रमाणे मांडलेली शोधप्रबंधाची रुपरेषा, गृहीतके व प्रकरण आराखडा हे संभाव्य आहेत. संशोधनकार्याच्या प्रगतीच्या अनुषंगाने संशोधनाअंती संशोधन विषयाचे स्वरुप व निष्कर्ष बदलण्याची संभाव्यता आहे.त्याचबरोबर सदरील संशोधन आराखड्यात संशोधनाला गती येईल त्याप्रमाणे आवश्यक त्या ठिकाणी बदल होणे संभव आहे.]

संदर्भ ग्रंथ सूची :-

१) श्री. फ. गु. हळकट्टी / प्रा. आर. एम. करडीगुद्दी	:	वचन सिध्दांत सार : महाराष्ट्र बसव परिषद, भालकी जि.बिदर -प्रथमावृती २०१६.
२) डॉ.एम.एम.कलबुर्गी सविता सि. नडकट्टी	:	वचन : बसव समिती, बेंगळुरू - २०१२
३) डॉ.शे.दे.पसारकर	:	वीरशैव अभंगगाथा खंड १ : शैवभारती शोधप्रतिष्ठान जंगमवाडी मठ, वाराणसी - २०२१
४) डॉ.शिवलिंग शिवाचार्य	:	श्री संत शिरोमणी मन्मथस्वामी सांप्रदायिक सप्तरत्न गाथा: संस्कृती प्रकाशन वीरमठ राजूर-२०११
५) प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य	:	शिवसांप्रदायिक नवरत्न संत भजनमालिका : तपोरत्न ग्रंथमाला संस्थान मठ, माजलगाव – २००२
६) पं.शिवाप्पा खके	:	श्री महादेव प्रभू गाथा : श्री सिद्धेश्वर प्रकाशन लासीन मठ वसमतनगर २००२
७) डॉ.शे. दे. पसारकर	:	श्री लक्ष्मण गाथा : श्री सिध्देश्वर प्रकाशन आष्टी २००१
८) डॉ. सुर्यकांत घुगरे	:	वीरशैव व इतर धर्म आणि समाज : गडहिंगलज, साधना बुकस्टॉल-१९९९

९) डॉ. शिवलिंग शिवाचार्य	:	संत शिरोमणी मन्मय स्वामीचे रत्नत्रय : संस्कृती प्रकाशन -राजूर- १९७३
१०) डॉ. भी. शि. स्वामी	:	लक्ष्मण महाराज व्यकी आणि वाङ्मय :शैवभारती शोध प्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी १९९४
११) डॉ. चंद्रशेखर कपाळे	:	मराठी वीरशैव संतकवी-बसवलिंग (चरित्र आणि वाङ्मय) : शैवभारती शोध प्रतिष्ठान जंगमवाडी मठ, वाराणसी १९९४
१२) डॉ. श्यामा घोणसे	:	वीरशैवांचे मराठी-हिंदी वाङ्मय – एक अभ्यास :नागलिंग स्वामी गुंजकर पुस्तकालय २००२
१३) डॉ. चंद्रकांत देऊळगावकर	:	मन्मथस्वामी व्यक्ती आणि वाङ्मय : शैवभारती शोध प्रतिष्ठान जंगमवाडी मठ वाराणसी २००३
१४) श्री कुमार कोठावळे	:	शिवयोगी श्रीमन्मथस्वामी चरित्र : मन्मथ स्वामी देवस्थान कमिटी - १९७३
१५) डॉ. सुधाकर मोगलेवार	:	मराठी वीरशैव साहित्य : नटरंग प्रकाशन, नागपुर १९७७

१६) डॉ. रवींद्र वैजनावराव बेम्बरे	:	संत मन्मथ दर्शन: महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी २०१९
१७) प्रा. श्री राम तोंडारे	:	मराठी वीरशैव संतांची अभंगवाणी : एक चिकित्सक अभ्यास मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद - जून १९८०
१८) श्री शिवानंद	:	विश्वज्योती म. बसवण्णांची वचनगाथा खंड १,२,३ महाराष्ट्र बसव परिषद, भालकी २०१९
१९) डॉ.बी. आर. हिरेमठ	:	बसवयुगीन शरणांची वचने खंड ४ : महाराष्ट्र बसव परिषद, भालकी २०२२
२०) डॉ. काशीनाथ अंबलगे	:	१२ वीं सदी की कन्नड कवयित्री अक्कमहादेवी और स्त्री-विमर्श : राधाकृष्ण प्रकाशन प्रा.लि.नयी दिल्ली
२१) श्री राजू ब. जुबरे	:	शरण जीवन दर्शन-भाग १,२,३ : महाराष्ट्र बसव परिषद, भालकी २०१६,
२२) श्री अभय मनोहर कल्लावार	:	दक्षिणेचा प्रबुद्ध म. बसवेश्वर: संकेत प्र. नागपुर - २०१६
२३) श्री प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य	:	श्री चन्नाकृत अभंगाचा गाथा : तपोरत्न ग्रंथमाला, संस्थानमठ माजलगाव २००४

२४) डॉ.शे.दे.पसारकर : श्री मन्मथशिवलिंगकृत परमरहस्य : एक अध्ययन : शैवभारती शोध प्रतिष्ठान,वाराणसी २००१

२५) डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज : श्री सिध्दांत शिखामणी रहस्य (शिवयोग शास्त्र) : संस्कृती प्रकाशन, राजूर २००२

मार्गदर्शक

डॉ.रवींद्र वैजनाथराव बेम्बरे
(मराठी विभाग)
वै.धुंडा महाराज देगलूरकर
महाविद्यालय देगलूर जि.नांदेड
दूरभाष : ९४२०८१३१८५

संशोधक

श्री शिवशरण गुरुपदआप्पा रटकलकर
सहशिक्षक
डॉ.यू.एस.वानखेडे विद्यालय,
कंजारा ता.औढा [नागनाथ]
जि.हिंगोली
दूरभाष : ९४२३९५१००६
shivsharanguruji@gmail.com

****